# उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नोती अभियान,

## जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत

## समुदाय स्तरीय प्रभागसंघ व्यवस्थापक पदाकरीता लेखी परिक्षा - प्रश्नपत्रिका

**दिनांक: ०६ मार्च, २०२२**
**दुपारी ०१:०० ते ०२.०० पर्यंत**

**एकुण प्रश्न: २०**
**एकुण गुण: २०**

| | | | |
|---|---|---|---|
| परिक्षार्थी बैठक क्रमांक - | | | (कार्यालयीन कामाकरीता) |
| परिक्षार्थी स्वाक्षरी - | | पर्यवेक्षक स्वाक्षरी | |

**सुचना:**

१) प्रत्येक प्रश्नास चार पर्याय (A B C D) दिलेले आहे. उत्तर नमुद करण्याकरीता प्रश्नाच्या बाजुला 'पर्याय निवड' या रकान्यामध्ये (A B C D) यापैकी योग्य पर्याय नमुद करावा. चुकीच्या पर्यायास गुण मिळणार नाहीत. पर्याय नमुद करण्याकरीता केवळ काळया किंवा निळया रंगाच्या बॉलपेनचा उपयोग करावा.

२) एक प्रश्नाकरीता एकच पर्याय नमुद करावा. दोन अथवा त्यापेक्षा जास्त पर्याय नमुद केल्यास, कोणताही पर्याय नमुद नसल्यास किंवा स्पष्ट नमुद नसल्यास सदर पर्याय निवड ग्राहय धरण्यात येणार नाही. खोडतोड करण्यात येवू नये.

३) सर्व प्रश्न अनिवार्य आहे.

**प्रश्न आणि पर्याय**

**प्रश्न क्रमांक ०१)** ४० ते ५० दरम्यानच्या विषम संख्यांची बेरीज किती ?
पर्याय:- A) २५ B ) १८० C) २२५ D) ४०५
पर्याय निवड: C

**प्रश्न क्रमांक ०२)** ४८ / X = X / २७; तर X = ?
पर्याय:- A) ३६ B ) ५४ C) १८ D) १६
पर्याय निवड: A

**प्रश्न क्रमांक ०३)** १० मजुर रोज ६ तास काम करुन एक काम १२ दिवसात पूर्ण करतात, तर तेच काम २० मजुर रोज ९ तास काम करुन किती दिवसात पूर्ण करतील ?
पर्याय:- A) ०६ B ) ०८ C) १० D) ०४
पर्याय निवड: D

**प्रश्न क्रमांक ०४)** १२ × १८ + १२ × १२ = ?
पर्याय:- A) ७२ B ) ३८४ C) ३६० D) ४८०
पर्याय निवड: C

**प्रश्न क्रमांक ०५)** ५ अंकी लहानात लहान संख्येला ३ अंकी लहानात लहान संख्येने भागल्यास उत्तर काय येईल ?
पर्याय:- A) १००० B ) १०० C) १०००० D) १०
पर्याय निवड: B

**प्रश्न क्रमांक ०६)** खालील पैकी कोणत्या पंचवार्षिक योजनेच्या काळात देशात किमान गरजा कार्यक्रम (MNP) राबविण्यास सुरुवात झाली ?
पर्याय:- A) चौथ्या B ) पाचव्या C) सहाव्या D) सातव्या
पर्याय निवड: B

**प्रश्न क्रमांक ०७)** डॉ.अब्दुल कलाम हे सन ------------- या काळात भारताचे राष्ट्रपती होते ?
पर्याय:- A) २००० ते २००५ B ) २००२ ते २००७ C) २००३ ते २००८ D) २००१ ते २००६
पर्याय निवड: B

**प्रश्न क्रमांक ०८)** यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री कोण होते ?
पर्याय:- A) मोरारजी देसाई B ) वसंतराव नाईक C) मारोतराव कन्नमवार D) यापैकी नाही
पर्याय निवड: C

**प्रश्न क्रमांक ०९)** महाराष्ट्रातील जिल्हयांचा उत्तरेकडून दक्षिणेकडे असा योग्य क्रम असणारा खालीलपैकी योग्य पर्याय कोणता ?
पर्याय:-
A) अकोला-बीड-हिंगोली-उस्मानाबाद
B) अकोला-हिंगोली-बीड-उस्मानाबाद
C) अकोला-हिंगोली-उस्मानाबाद-बीड
D) अकोला-बीड-उस्मानाबाद-हिंगोली
पर्याय निवड: B

**प्रश्न क्रमांक १०)** ब्रांझ हे कशाचे संमिश्र आहे ?
पर्याय:- A) तांबे व लोखंड B ) लोखंड व पितळ C) लोखंड व कथील D) तांबे व कथील
पर्याय निवड: D

**प्रश्न क्रमांक ११)** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे राज्यस्तरीय मुख्य कार्यालय कोठे आहे ?
पर्याय:- A) पुणे B ) बेलापूर नवी मुंबई C) औरंगाबाद D) यवतमाळ
पर्याय निवड: B

**प्रश्न क्रमांक १२)** स्वयंसहाय्यता गटाला दिले जाणारे खेळते भांडवल किती रक्कमेचे असते ?
पर्याय:- A) २ ते ५ हजार B ) १२ ते १५ हजार C) ३० ते ४० हजार D) ५० ते ६० हजार
पर्याय निवड: B

प्रश्न क्रमांक १३) यवतमाळ जिल्हयामध्ये किती तालुक्यांमध्ये उमेद अभियान राबविण्यात येते ?

पर्याय:- A) १२ B ) १४ C) १६ D) ०६

पर्याय निवड: C

प्रश्न क्रमांक १४) अपंग, विधवा, परित्यक्त्या अशा विशेष गटांच्या बांधणीबाबत खालील पैकी कोणती बाब सत्य आहे ?

पर्याय:-
A) सदस्य किमान पाच असेल तरी गट बांधता येतो
B) पुरुषांचा देखील गट बांधता येतो.
C) अशा गटामध्ये साधारणपणे १० सदस्य असावे.
D) वरील सर्व पर्याय लागू होतात.

पर्याय निवड: D

प्रश्न क्रमांक १५) उमेद अभियानाचा लक्षगट कोणता आहे ?

पर्याय:- A) अपंग B ) भूमिहिन C) विधवा D) वरीलपैकी सर्व

पर्याय निवड: D

प्रश्न क्रमांक १६) खालील पैकी कोणत्या बाबीचा समावेश दशसुत्री मध्ये नाही ?

पर्याय:- A) प्रभागसंघ मार्गदर्शन करणे B ) अद्यावत अभिलेखे C) सरकारी योजना D) नियमित बचत

पर्याय निवड: A

प्रश्न क्रमांक १७) खालीपैकी प्रभागसंघास उत्पन्न न देणारी बाब कोणती ?

पर्याय:-
A) ग्रमासंघाकडून मिळणारे कर्जावरील व्याज
B) सदस्यता शुल्क
C) दंडाची रक्कम
D) ऑडीट फी चा खर्च

पर्याय निवड: D

प्रश्न क्रमांक १८) उमेद अभियान अंतर्गत परसबागेची निर्मिती मुख्यता कोणत्या कारणासाठी करतात ?

पर्याय:- A) फुलांची शेती B ) आहार व पोषण C) जनावरांसाठी चारा D) मृदा संवर्धन

पर्याय निवड: B

प्रश्न क्रमांक १९) स्वयंसहाय्यता समुंहासाठी गाव स्तरावर कोणती संस्था कार्य करते ?

पर्याय:- A) प्रभाग संघ B ) ग्रामसंघ C) तालुकास्तरीय संघ D) गणस्तरीय संघ

पर्याय निवड: B

प्रश्न क्रमांक २०) उमेद अभियांसदर्भात खालीलपैकी कोणत्या योजनेचा लाभ देण्यात येतो ?

पर्याय:-
A) पं.दीन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना
B) नरेगा अंतर्गत उन्नती योजना
C) शासकीय विमा योजना
D) वरील पैकी सर्व

पर्याय निवड: D

------------------------X--------------------------

कच्चा कामा करीता जागा